**प्रेस नोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १२.०१.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्रीमती संध्या हरिदास मेश्राम, वय ४२ वर्षे, पद : उप अभियंता, बांधकाम उपविभाग, अमरावती क्र.१, जिल्हा परिषद, अमरावती, वर्ग – १<br>२) श्री.अण्णा नामदेवराव वानखडे, वय ५१ वर्षे, पद : मैलकुली, बांधकाम उपविभाग, क्र.१, जि.प.अमरावती, वर्ग – ४ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक १२.०१.२०२१ चे १६.२६ वा. ते १६.४० वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | उप अभियंता, बांधकाम उपविभाग, अमरावती क्र.१, जि.प. अमरावती यांचे दालन |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ११.०१.२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांनी यापुर्वी थुगांव–खानापूर जोड रस्त्याचे केलेल्या कामाचे देयक मंजुर करुन दिल्याबददल मोबदला म्हणुन तसेच तक्रारदार यांना कु–हा येथील हायमास लाईट बसविण्याचे कामाची त्यांना आवंटीत झालेल्या निवीदेचा करारनामा करुन त्यांचे नावाने कार्यारंभ आदेश काढणेकरीता आलोसे क्र.१) श्रीमती संध्या मेश्राम, उपअभियंता व आलोसे क्र.२) अण्णा वानखडे यांची ४०,०००/– रु व तडजोडीअंती ३०,०००/– रुपये लाचेची मागणी असल्याचे तसेच सदर लाच रक्कम आलोसे क्र.२) अण्णा वानखडे यांचे मार्फतीने स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक १२.०१.२०२१ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून आलोसे क्र.२) अण्णा वानखडे यांनी आलोसे क्र.१) श्रीमती संध्या मेश्राम, उपअभियंता यांचेकरीता ३०,०००/– रुपये लाच स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन दोन्ही आरोपींविरुध्द पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, म.पो.हवा. माधुरी साबळे, पो.ना.सुनिल व–हाडे, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री क्रमांक : १०६४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१–२५५२३५५,२५५३०५५

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned with CamScanner